# विद्यमान न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, पारशिवनी, यांचे न्यायालयात

सं.फौ.ख.क्र. १८/२०२६
शासन-वि-शुभम
नि.क्र.

## गुन्हयांचा तपशिल

१. **गुन्हा घडल्याची दिनांक -** २५/१२/२०२५

२. **गुन्हा नोंदविल्याची तारीख-** २५/१२/२०२५

३. **फिर्यादीचे नांव व पत्ता -** पोलीस स्टेशन अधिकरी,
पो.स्टे. पारशिवनी.

४. **आरोपीचे संपुर्ण नांव पत्ता -** शुभम राजु घोडमारे
वय ३०– वर्षे, धंदा-मजुरी,
रा.पारशिवनी जि. नागपूर

५. **अपराधाचा तपशिलः**

तुम्ही दिनांक २५/१२/२०२५ रोजी १७.४५ ते १८.०० वाजताच्या सुमारात एम.जी. कॉलेज चौक पारशिवनी येथे तुम्ही तुमच्या ताब्यातील वाहन क्र.एम.एच.३१-बी.ए.८०२८ हे वाहन दारु पिऊन नशेत वाकडी-तीकडी व अनियंत्रीतपणे चालविले त्यामुळे येणाऱ्या-जाणाऱ्या लोकांच्या जीवीतास धोका निर्माण झाला आणि अशा प्रकारे तुम्ही मोटार वाहन कायद्याचे कलम १८५ नुसार गुन्हा केला आहे.

वरील गुन्हयासंबंधातील तपशिल आरोपीला मराठी भाषेमध्ये वाचून व समजावून सांगीतला.

GAJENDRA ONKARRAO WANKHADE
Digitally signed by GAJENDRA ONKARRAO WANKHADE
Date: 2026.03.14 15:15:46 +0530

**( जी. ओ. वानखडे )**
दिनांकः १४/०३/२०२६. न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
पारशिवनी.

## आरोपीचा जबाब/म्हणणे

**प्रश्न क्र.१.** तुम्हाला पोलीसांनी दाखल केलेल्या खटल्याच्या प्रती मिळाल्या काय ?

**उत्तर** -होय.

**प्रश्न क्र.२.** तुम्हाला गुन्हयाचा तपशिल वाचून समजावून सांगीतला तो तुम्हाला समजला काय ?

**उत्तर** -होय.

**प्रश्न क्र.३.** तुम्हाला गुन्हा कबुल आहे काय ?

**उत्तर-** मला गुन्हा कबुल आहे.

-------------

आरोपीची सही

आरोपीला विचारणा केली असता आरोपीने स्वताःहुन स्वइच्छेने गुन्हा कबुल करीत असल्याचे सांगीतले. त्याबाबत आरोपीने पुरसिस दाखल केली. आरोपीने स्वतःहुन गुन्हा कबुल करीत असल्याचे दिसून आल्यामुळे आरोपीची कबुली स्विकृत करण्यात येते.

GAJENDRA ONKARRAO WANKHADE
Digitally signed by GAJENDRA ONKARRAO WANKHADE Date: 2026.03.14 15:15:51 +0530

**( जी. ओ. वानखडे )**

दिनांकः १४/०३/२०२६. न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, पारशिवनी

## न्यायनिर्णय

(दिनांकः १४/०३/२०२६ रोजी पारीत)

आरोपीने गुन्हा कबुल केल्यामुळे आरोपीस सदर खटल्यामध्ये दोषी धरण्यात येते. आरोपीस शिक्षेबाबत विचारणा केली असता आरोपीने असे सांगीतले की, त्याच्या घरची परिस्थीती ही गरीबीची असल्याने तसेच त्याचा हा पहीला गुन्हा असल्याने त्याने, कमीत कमी शिक्षा करण्याची विनंती केली.

गुन्हयाचे स्वरुप व आरोपीने केलेले कथन लक्षात घेता

आरोपीस भारतीय नागरीक सुरक्षा संहितेच्या कलम २७५ नुसार मोटार वाहन कायदाचे कलम १८५ च्या शिक्षापात्र अपराधासाठी कारावसाची शिक्षा न ठोठावता रुपये १०,०००/-(दहा हजार रुपये) दंड ठोठावण्यात येत आहे. दंड रक्कम भरणा केल्या कसूर केल्यास पंधरा दिवसाची साध्या कारावासाची शिक्षा ठोठावण्यात येत आहे.

GAJENDRA ONKARRAO WANKHADE

Digitally signed by GAJENDRA ONKARRAO WANKHADE
Date: 2026.03.14 15:15:55 +0530

**( जी. ओ. वानखडे )**

दिनांकः १४/०३/२०२६.

न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
पारशिवनी